FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154144

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुं., पहिली खबर क्र. FIR No. ३६, वर्ष Year २०२१, दिनांक Date २४/०८/२०२१

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. का. अधि १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from ५/७/२०२१ वेळ Time १२.५०, तारीख पर्यंत Date to २३/८/२०२१ वेळ Time १५:१६
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २३/०८/२०२१, वेळ Time १५.१५
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२०२१, तारीख Date २४/०८/२०२१ वेळ Time ०४.५०

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी — लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ४ कि.मी. पश्चिम, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नांव Address of Occurrence Name त्रिवेणी संगम म्युनि मराठी उ.प्रा.शाळा, म.न.पा. मार्ग, करी रोड, मुं-४०००१२, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name रमेश आत्माराम म्हस्के (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name आत्माराम म्हस्के
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ६६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८२०७६६२७६
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No. — रू.नं. ४०३, अविनाश सहकारी को.ऑप. हौ.सो. वि. फडके मार्ग, मुलुंड (पू) मुंबई
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   राजेंद्र नरसिंगराव राजपूत, वय-४७ वर्षे, धंदा-नोकरी, पद-पर्यवेक्षक वि भांडारपाल, शिक्षण अधिकारी कार्यालय, मिड डे मिल सेक्शन पहिला माळा, त्रिवेणी संगम बिल्डिंग शाळा, करी रोड, मुंबई-४०००१२ राही. ६०३, पंचरत्न टॉवर, के.डी.एम.सी. जवळ, वीज बिल ऑफीस, खडकपाडा कल्याण (प) ठाणे

फिर्यादी रमेश श्रावण म्हस्के यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आली असून ती प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावी.

समक्ष

Rhumal

राहुल धुमाळ
पोलीस निरिक्षक
भा.प्र.वि. मुंबई

(रमेश श्रावण म्हस्के)

जबाब दि. २३/०८/२०२१

श्री.रमेश श्रावण म्हस्के, हि ६६ वर्षे, धंदा-व्यवसाय पत्ता:-अे/४०३, अविनाश सन्मार्ग को.ऑ.हौ.सो. व्ही.बी. फडके मार्ग, मुलूंड(पूर्व) मुंबई ४०० ०८१ मोबाईल क्र. ९८२०७६६२७६, ९००४८४००२३

---

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या ३० वर्षापासुन रहावयास आहे. मी मुंबई महानगर पालिकेमध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करीत असुन त्यातुन माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी मुंबई महानगर पालिकेमध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करतो. मी महानगर पालिकेच्या शाळेतील मुलांना मध्यांन भोजन पुरवठा करतो व त्या कामाचा ठेका दिप्ती महिला मंडळ,दत्त माउली महीला मंडळ, विहंग महीला मंडळ यांच्या मार्फतीने घेतो. दिप्ती महिला मंडळाची अध्यक्षा माझी पत्नी सौ. मंगल म्हस्के हि आहे. तसेच दत्त माउली महीला मंडळाची अध्यक्षा माझी बहीण आनंदी भोसले ही आहे व विहंग महीला मंडळाची अध्यक्षा माझी ओळखीची महीला नामे सुर्वणा कोकाटे ही आहे या सर्व महीला मंडळाची सरकारी कामे मीच बघतो.

सन २०१० ते मार्च २०२० पर्यंत मी उपरोक्त वर नमुद सर्व महीला मंडळाच्या मार्फतीने मी मुंबई महानगर पलिकेतील शाळांना भोजन पुरवठा केला आहे. सदर कामाचे वेगवेगळी अशी अंदाजे १५ ते २० लाखांची रूपयांची बीले मुंबई महानगर पालिकेकडे बाकी आहेत. सध्या लॉकडाऊन असल्याने मला पैशाची खुप गरज आहे म्हणुन मी जुलै महीन्यात शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथे चौकशीसाठी गेलो असता तेथील कारकुन राजपूत यांना भेटलो. तेव्हा त्यांनी मला सांगितले कि, मागील बीलांचे तुमच्या खात्यावर दोन ते तीन लाख रुपये जमा झाले आहेत सदर जमा झालेल्या बीलांचे १० टक्याप्रमाणे पैसे दयावे लागतील असे म्हणुन लाचेच्या रक्कमेची मागणी केली व त्यानंतरच माझी उर्वरीत बीले काढणार असल्याचे मला सांगितले.

शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक कारकुन श्री. राजपूत यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक ०५/०७/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो व तक्रार अर्ज दिला.

शिक्षण अधिकारी कार्यालय, येथील लोकसवेक राजपूत यांनी मला दि. ०८/०७/२०२१ रोजी माझे पेंडीग बिलांच्या कामकाजासंदर्भात त्यांच्या कार्यालयात बोलाविले असल्याचे मी ला.प्र.वि कार्यालयातील पो.नि.धुमाळ यांना सांगितले असता त्यांनी माझे अर्जावर दिनांक ०८/०७/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक ०८/०७/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता येण्यास सांगितले. पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ०८/०७/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदरवेळी स.पो.आ कालेकर व दोन पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोनि धुमाळ यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ कालेकर यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.धुमाळ यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि.धुमाळ यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि धुमाळ यांनी दिनांक ०८/०७/२०२१ रोजी पंचांसमक्ष शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक कारकुन राजपूत यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून आर्थर रोड, भायखळा, मुंबई येथे शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि.धुमाळ यांनी शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक राजपूत यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. बोकडे यांचे सह पाठविले असता लोकसेवक राजपूत हे कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची भेट झाली नाही त्यामुळे मी राजपूत यांच्या मोबाईल फोनवर संपर्क केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद आढळुन आला.

त्यानंतर पो.नि धुमाळ यांनी दिनांक ०९/०७/२०२१ रोजी पंचांसमक्ष लोकसेवक श्री. राजपूत यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ०९/०७/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदरवेळी स.पो.आ कालेकर व दोन पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर होते. पो.नि. धुमाळ यांच्या सुचनेप्रमाणे मी पंचांसमक्ष माझा मोबाईल क्र. ९८२०७६६२७६ वरुन लोकसेवक राजपूत यांचा मोबाईल क्र.

समक्ष
[signature]
(राहुल धुमाळ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature]

९०९६३५५५२२ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व दि. १२/०७/२०२१ रोजी कार्यालयात येवुन प्रत्यक्ष भेटण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १२/०७/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. पो.नि. धुमाळ यांच्या सुचनेप्रमाणे मी पंचासमक्ष माझा मोबाईल क्र. ९८२०७६६२७६ वरून लोकसेवक राजपूत यांचा मोबाईल क्र. ९०९६३५५५२२ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला नाही त्यानंतर लगेचच लोकसेवक राजपूत यांनी माझे मोबाईल फोनवर फोन केला व मला कार्यालयात बोलाविले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पो. नि धुमाळ यांनी सदर दिवशी पंचांसमक्ष शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक राजपूत यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून आर्थर रोड, भायखळा, मुंबई येथे शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि.धुमाळ यांनी शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक राजपूत यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. बोकडे यांचे सह पाठविले असता लोकसेवक राजपूत हे कार्यालयात उपस्थित होते. माझेमध्ये व लोकसेवकामध्ये कामसंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक राजपूत यांनी एका सफेद रंगाच्या कागदच्या तुकडयाबर लिहून, यापूर्वी माझे अकाऊंट वर सोडलेल्या बिलांची एकुण रक्कम रू. २,४०,००० होत असुन त्याच्या १० टक्क्याप्रमाणे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. सदरवेळी मी लोकसेवक राजपूत यांना बिलांची एकुण रू. २,४०,०००/- रक्कमेच्या १० टक्क्याने रू. २४,०००/- रक्कम होत असल्याचे सांगितले असता लोकसेवक राजपूत यांनी " हा " असे म्हणुन माझे बोलण्यास दुजोरा दिला. त्यानंतर मी पुन्हा आर्थर रोड, भायखळा, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. धुमाळ यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक राजपूत याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक राजपूत यांनी लाचेची रक्कम घेवुन येण्यापुर्वी फोन करून येण्यास सांगितल्याने पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पो.नि.धुमाळ यांनी मला घरी जाण्यास सांगितले व लाचेची रू. २४,०००/- रक्कमेची व्यवस्था करून लाप्रवि कार्यालयास येण्यास सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १४/०७/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. पो.नि. धुमाळ यांच्या सुचनेप्रमाणे पंचांसमक्ष मी माझा मोबाईल क्र. ९८२०७६६२७६ वरून लोकसेवक राजपूत यांचा मोबाईल क्र. ९०९६३५५५२२ वर फोन केला असता त्यांनी तो कट केला. त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी मला लोकसेवक राजपूत यांच्याशी भेट केव्हा होईल? याबाबत विचारणा केली असता मी लोकसेवक राजपूत यांचेसोबत फोनवर चर्चा झाल्यानंतर भेट होईल असे सांगितले असता त्यांनी सापळापुर्व/सापळा कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर लोकसेवक राजपूत यांनी दि. १२ /०८ /२०२१ रोजी त्यांचे मोबाईल क्र..९०९६३५५५२२ वरून माझे मोबाईल फोन क्र.९८२०७६६२७६ वर फोन केला सदरवेळी आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली व लोकसेवक राजपूत यांनी मला दि. २३/०८/२०२१ रोजी लाचेची रक्कम घेवुन त्यांचे कार्यालयात बोलाविले असल्याचे मी पो.नि. धुमाळ यांना सांगितले. त्याप्रमाणे पो.नि. धुमाळ यांनी लाचेची रक्कम घेवुन मला दि. २३/०८/२०२१ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता बोलाविले.

पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. २३/०८/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. मी पो.नि.धुमाळ यांना रू. १०,०००/- लाचेची रक्कम माझेकडे असल्याचे सांगितले. पो.नि. धुमाळ यांनी माझेकडे १०,०००/- रूपये असल्याने उर्वरीत १४,०००/- रूपये हे खेळण्यातील नोटा लाचेच्या रक्कमेकरीता वापरत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले. पो.नि. धुमाळ यांच्या सुचनेप्रमाणे मी पंचांसमक्ष माझा मोबाईल क्र. ९८२०७६६२७६ वरून लोकसेवक राजपूत यांचा मोबाईल क्र. ९०९६३५५५२२ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व आज रोजी कार्यालयात येवुन प्रत्यक्ष भेटण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी आज रोजी सापळापुर्व/सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेऊन माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/- (रू. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांचे क्रमांक नोंद करून त्या नोटांच्या छायांकित प्रती लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशिनवर काढुन घेतल्या.

(राजु ? धुमाळ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २४,०००/- (रू. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा व रू. ५०० दराच्या २८ खेळण्यातील नोटा ) स्वत:चे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अॅथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अॅथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम मी माझे शर्टाच्या वरील खिशात ठेवली. पो.नि. धुमाळ यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोक्यावरुन डावा हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी माझी सापळापुर्व/सापळा पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून ना.म.जोशी मार्ग, जवळील बावला मस्जीद मुंबई येथे आलो. त्यावेळी पो.नि. धुमाळ यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. बोकडे यांच्यासह शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई येथील लोकसेवक राजपूत येथील कार्यालयात पाठविले व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून आले. मी लोकसेवक राजपूत यांच्या कार्यालयाच्या आवारात आलो व तेथुन मी माझे मोबाईल क्र. ९८२०७६६२७६ वरून लोकसेवक राजपूत यांचा मोबाईल क्र. ९०९६३५५५२२ वर फोन केला असता त्यांनी मला त्यांच्या पहिल्या मजल्यावरील केबीनमध्ये बोलाविले. मी लोकसेवक यांच्या केबीन मध्ये गेलो असता लोकसेवक राजपूत यांच्याशी माझी कामासंदर्भात चर्चा झाली व त्यांनी मला माझे पेंडींग बिलाचा हिशोब सफेद कागदाच्या तुकडयावर लिहून दिला व त्यांनी मला हाताच्या बोटांच्या इशाऱ्याने लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी माझे कडील अॅथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम २४,०००/- (रू. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा व रू. ५०० दराच्या २८ खेळण्यातील नोटा ) लोकसेवक यांच्या उजव्या हातात दिली असता त्यांनी ती स्विकारून त्यांच्या टेबलाच्या उजव्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. सदरवेळी मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझा डावा हात केसावरून फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक राजपूत यांस रक्कम २४,०००/- (रू. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा व रू. ५०० दराच्या २८ खेळण्यातील नोटा ) लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. राजेंद्र नरसिंगराव राजपूत, वय-४७ वर्षे, धंदा-नोकरी, पद - पर्यवेक्षक नि भांडारपाल, खाते - शिक्षण विभाग, कार्यालयाचा पत्ता - शिक्षण अधिकारी कार्यालय, मिड डे मिल सेक्शन, पहिला मजला, त्रिवेणी संगम बिल्डिंग शाळा, करीरोड (पुर्व), मुंबई. रा.ठि.- ६०३, पंचरत्न टॉवर, के.डी.एम.सी. जवळ, बी वॉर्ड ऑफीस, खडकपाडा, कल्याण पश्चिम, ठाणे असे असल्याचे मला, पंचांना व पोलिस पथकास समजले.

मी दिप्ती महिला मंडळ, दत्त माऊली मंडळ व विहंग महिला मंडळाच्या मार्फतीने मुंबई महानगर पालिकेमध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करतो. सन २०१० ते २०२० मार्च पर्यत मी मुंबई महानगर पालिकेमधील शाळांना शालेय पोषण आहार पुरवठा करीत असुन सदर कामाचे वेगवेगळी अशी अंदाजे १५ ते २० लाखांची रूपयांची बीले मुंबई महानगर पालिकेकडे बाकी आहेत. सदर पेंडीग बिलांची रक्कम मंजूरी करण्याकरीता शिक्षण विभाग, मिड डे मिल सेक्शन, पहिला मजला, त्रिवेणी संगम बिल्डिंग शाळा, करीरोड (पुर्व), मुंबई येथील लोकसेवक राजेंद्र नरसिंगराव राजपूत यांनी माझेकडे दि. १२/०७/२०२१ रोजी पडताळणी दरम्यान यापूर्वी माझे खात्यावर वर जमा झालेल्या बिलांची एकुण रक्कम रू. २,४०,०००/- रक्कमेच्या १० टक्क्याने रू. २४,०००/- लाचेची मागणी करून दि. २३/०८/२०२१ रोजी लाचेची रक्कम रू. २४,०००/- स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक राजेंद्र नरसिंगराव राजपूत यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( राहूल धुमाळ ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ त्वरित ........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी हे दिप्ती महिला मंडळ, दत्त माऊली मंडळ व विहंग महिला मंडळाच्या मार्फतीने म.न.पा. मध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करतात. सन २०१० ते मार्च २०२० पर्यंत म.न.पा. शाळाना शालेय पोषण आहार पुरवठा करत असुन सदर कामाचे अंदाजे १५ ते २० लाख रूपयांची बिले बाकी आहेत. सदर पेंडींग बिलाची रक्कम मंजुरी करण्याकरिता म.न.पा. शिक्षण विभागातील लोकसेवक राजेंद्र नरसिंगराव राजपुत यांनी फिर्यादीकडे पडताळणी दरम्यान त्यांच्या यापूर्वी खात्यावर जमा झालेल्या बिलाच्या एकुण रक्कम रुपये २,४०,०००/- रकमेचा १०% ने रु. २४,०००/- रक्कम लाच स्वीकारले म्हणुन गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

राहुल घुमाळ, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name राहुल घुमाळ

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुं.

Posting

Code No. of I. O. ..........

15. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

प्रतिलिपी

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report